लघु पाटबंधारे प्रकल्पातून होणाऱ्या गळती
व दुरुस्तीबाबतचे प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
पाटबंधारे विभाग,
परिपत्रक क्रमांक दुरुस्ती २००३/२७०१/(२२/२००३)सिं.व्य.(कामे)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- १५ फेब्रुवारी २००३.

लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या धरणातून होणाऱ्या गळतीबाबत करावयाच्या दुरुस्तीसाठी सध्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यांत येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

धरणाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर गळती व दुरुस्तीसारखी समस्या निर्माण झाल्यावर त्यावरील उपाय सुचविण्यासाठी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेशी संपर्क साधण्यात येतो. बऱ्याचवेळा धरणाच्या बांधकामातून अशी गळती कामाची योग्य गुणवत्ता न राखल्यामुळे होते. अशा उपाययोजनांमध्ये काही संकल्पनाचे काम करावे लागेल असे नसते. परंतु धरण सुरक्षिततेचे कारण दिल्यामुळे अशा प्रस्तावावरील कार्यवाहीस प्राधान्य द्यावे लागते. प्रस्तावावरील अभिप्रायासाठी धरण सुरक्षिततेचे कारण पुढे करुन वारंवार पाठपुरावा करण्यांत येतो. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून अभिप्राय प्राप्त झाल्यावर दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यांत येतात. अशा कामावर झालेल्या खर्चावर जेव्हा महालेखापाल कार्यालयाकडून आक्षेप घेतले जातात, तेंव्हा मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक हयांना विनाकारण त्यात गोवले जाते. शिवाय अशा प्रस्तावांवरील कराव्या लागणाऱ्या कार्यवाहीमुळे मूळ कार्यक्रमानुसारच्या संकल्पनाचे काम मागे पडते.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता लघु पाटबंधारे प्रकल्पांची गळती व दुरुस्तीचे प्रस्ताव मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडे पाठविणे आवश्यक वाटल्यास खालील कार्यपध्दती अवलंबिण्यांत यावी.

१) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडे गळती/दुरुस्ती प्रस्ताव अभिप्रायासाठी पाठवावयाचे असल्यास असे प्रस्ताव शासनाच्या मान्यतेने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेस पाठवावेत.

२) प्रस्तावाचे योग्य समर्थन नमूद करावे.

३) प्रस्तावासोबत धरणातील दोष/उणिवा का उद्‌भवल्या, त्याबाबतची कारणमिमांसा, गुणवत्ता तपासणीबाबत नोंदवहया तपासून बांधकामाच्या दर्जाबाबत अभिप्राय संबंधित बांधकामाच्या वेळी कार्यभार सांभाळणाऱ्या कार्यकारी अभियंता / उप अभियंता हयांची नांवे व बांधकामाबाबत, प्रकल्प केंव्हा पूर्ण झाला, त्याची कार्यक्षमता, यापूर्वी दोष/उणिवा दूर करण्यासाठी केलेली उपाययोजना त्यावर आतापर्यंत झालेला खर्च व त्याचा उपयोग याबाबत सर्वसाधारण टिप्पणी प्रस्तावात नमूद करावी.

वरील कार्यपध्दतीप्रमाणे यापुढे धरणातील गळती/दुरुस्ती याबाबतचे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडे अभिप्रायासाठी, उपाय सुचविण्यासाठी पाठवावयाचे प्रस्ताव शासनामार्फत सादर करावेत.

शासन स्तरावर केलेल्या विश्लेषणानंतर अशा प्रस्तावांवर आवश्यकतेनुसार उचित कार्यवाही केली जाईल.

(अ. आ. पठाण)
शासनाचे अवर सचिव

प्रत :- सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग
सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग
सर्व तांत्रिक कार्यासने,
सिं.व्य.(कामे) कार्यासन संग्रहार्थ.

कार्यकारी अभियंता
संकल्प चित्र विभाग
(स्थापत्य - ४) म. अ. वि. ... नाशिक
दिनांक, ७/३/०३